पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-६
सभावृत्तांत

दि.-३/९/२०१४ वेळ -सकाळी १२:०० वाजता

------------------- ---------------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.३/९/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.जम सोनाली पोपट सभापती
२) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
३) मा.भोसले राहूल हनुमंतराव
४) मा.कदम सदगुरु महादेव
५) मा.कैलास महादेव कदम
६) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
७) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
८) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
९) मा.गायकवाड संध्या सुरदास
१०) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११) मा.मोटे किरण बाळासाहेब
१२) मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-प्रभाग अधिकारी, मा.खाबडे-कार्यकारी अभियंता, विदयुत, मा.खरात- कार्यकारी अभियंता, पापु, मा.गट्टुरवार- कार्यकारी अभियंता जलनि:सारण, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, जावळे- उपअभियंता पापु, श्री.सोनवणे- उपअभियंता,विदयुत, श्री.दिलीप धुमाळ - उपअभियंता,विदयुत,श्री.शिंदे- उपअभियंता, स्थापत्य, श्रीमती अनघा पाठक- उपअभियंता जलनि:स्सारण, श्री.वाईकर- उपअभियंता स्थापत्य , श्री.अकबर शेख- कनिष्ठ अभियंता वि, श्री.रविंद्र भोकरे- सहा.आरोग्याधिकारी, श्री.भोसले - उद्यान निरीक्षक, हे अधिकारी उपस्थित होते.

------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक- १) विदयुत क क्षेत्रीय कार्यालयामधील सार्व.सुरक्षितता,इमारत शाळा,शॉपिंग सेंटर,लोकारोग्य,विशेष योजना इ.लेखाशिर्षामध्ये नमूद केलेल्या कामांकरिता अंतर्गत तरतुद वर्गीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक-२) ४५० व्यासाची व ५०० मीटर लांबीची ड्रेनेजलाईन टाकण्याबाबत- मा.रमा ओव्हाळ,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३) नामकरण संदर्भात-मा.राहुल भोसले,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) नामकरण संदर्भात-मा.राहुल भोसले,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) नामकरण संदर्भात-मा.राहुल भोसले,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-६) वॉर्ड क्र.६२ मधील शौचालय दुरुस्तीबाबत-मा.संध्या गायकवाड, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-७) सांगवी आ.क्र. हे मनपा विकास आराखडयामध्ये उदयान असून याठिकाणी मोकळी जागा क्रिडांगण विकसीत करणेबाबत- मा.अतुल शितोळे,मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-८) नामकरण करणेबाबत-मा.सदगुरु कदम,मा.कैलास कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-९) बालभवन मधील व्यायामशाळेस अंतर्गत असलेले दरवाजे बाहेरुन करणे व सांस्कृतिक कार्यालयामध्ये दोन खोल्या करणे बाबत- मा.सदगुरु कदम,मा.कैलास कदम यांचा प्रस्ताव.

-----

दिनांक ६/८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---

ठराव क्रमांक - ७६ विषय क्रमांक- १

दिनांक ३/९/२०१४ विभाग-

सुचक- मा. सदगुरु कदम अनुमोदक- मा. राहूल भोसले

संदर्भ- मा.क क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.वि/कक्षेका/६६९/२०१४दि.३/९/२०१४

मा.क क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे---

विदयुत विभागाकडील प्रस्तावासोबत सादर केलेल्या परिशिष्ठ अ-गोषवारा व परिशिष्ठ ब-वाढ घट तक्त्याप्रमाणे कामांवरील वाढ / घट तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ७७ विषय क्रमांक- २
दिनांक ३/९/२०१४ विभाग-
सुचक- मा. रमा ओव्हाळ अनुमोदक- मा. शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा.रमा ओव्हाळ व मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

दापोडी गावातील सर्व ड्रेनेजचे पाणी राजा हरिश्चंद्र पथ रस्त्यांवरुन सरळ दापोडी स्मशानभूमीकडे जाणा-या रस्त्यांवरील ड्रेनेज लाईन ही ३० वर्षापुर्वीची असुन पुणे महानगरपालिकेने टाकलेली आहे.सदरची ड्रेनेजलाईन ही जुनी झाल्याने व छोटी असल्यामुळे संपुर्ण दापोडी गावातील पाणी या लाईनला जोडल्यामुळे ही लाईन वारंवार चोकअप व ओव्हर फलो होऊन् सडलेली असल्याने पाणी रस्त्यांवर इतरत्र वाहत आहे.यामुळे पाणी वर येऊन आसपासच्या घरांमध्ये,झोपडयांमध्ये पाणी जाऊन येथील नागरिक त्रस्त् झालेले आहेत. पिंपरी चिंचवड मधील नागरिक औंधबोपोडी व भाऊ पाटील रोड या रस्त्यांकडे जात असताना वाहतुक व्यवस्थेत अडथळा निर्माण होऊन ट्रॅफिक जाम होऊन नागरिकांना त्रास होत आहे.तरी सदरची ड्रेनेजलाईन ताबडतोब बदली करुन ४५० व्यासाची व ५०० मीटर लांबीची लाईन टाकण्यात यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ७८ विषय क्रमांक- ३
दिनांक ३/९/२०१४ विभाग-
सुचक- मा. राहुल भोसले अनुमोदक- मा. शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा.राहुल भोसले व मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

नेहरुनगर प्रभाग क्र.३८ मधील उर्दू प्राथमिक शाळेस “आला हजरत ईमाम अहमद रजा” उर्दू शाळा असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - ७९ विषय क्रमांक- ४
दिनांक ३/९/२०१४ विभाग-
सुचक- मा. राहुल भोसले अनुमोदक- मा. शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा.राहुल भोसले व मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

नेहरुनगर प्रभाग क्र.३८ मधील सेवा विकास बँक शेजारी प.वसंतदादा पाटील शाळेकडील जाणा-या रस्त्याच्या सुरुवातीला प्रस्तावित प्रवेशद्वार असुन सदर प्रस्तावित प्रवेशद्वारास “पद्मभूषण वसंतदादा पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय” असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ८०　　　　　　　　　　विषय क्रमांक- ५
दिनांक ३/९/२०१४　　　　　　　　　　विभाग-
सुचक- मा. राहुल भोसले　　　　　　　　अनुमोदक- मा. शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा.राहुल भोसले व मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

नेहरुनगर प्रभाग क्र.३८ मधील शितल हॉटेल समोरील चौकात श्री.आई माताजी मंदीराकडे जाणा-या रस्त्याच्या सुरुवातीला प्रस्तावित प्रवेशद्वार असुन या प्रवेशद्वारास **"श्री.आई माताजी मंदीर"** असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - ८१　　　　　　　　　　विषय क्रमांक- ६
दिनांक ३/९/२०१४　　　　　　　　　　विभाग-
सुचक- मा. संध्या गायकवाड　　　　　　अनुमोदक- मा. शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा.संध्या गायकवाड व मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.६२ मधील संजयनगर मधील शौचालय यांची अवस्था फार वाईट असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.त्यामुळे त्या शौचालयाची लवकरात लवकर दुरुस्ती करण्यात यावी. व स्वच्छता करणेत यावी.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - ८२　　　　　　　　　　विषय क्रमांक- ७
दिनांक ३/९/२०१४　　　　　　　　　　विभाग-
सुचक- मा. अतुल शितोळे　　　　　　　अनुमोदक- मा. संजय काटे
संदर्भ-मा.अतुल शितोळे व मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

सांगवी येथे मनपा विकसित आराखडयामध्ये आ.क्र.३१९ हे उदयान म्हणुन आरक्षित असुन सदयस्थितीमध्ये सांगवी मध्ये ३ उदयान असुन मधुबन येथे नवीन उदयान विकसित होत आहे. यामुळे आ.क्र. ३१९ हि आरक्षित जागा मनपाकडुन मोकळया जागा विकसित करावी व अदयावत क्रिडांगण याठिकाणी करणे योग्य होईल. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - ८३　　　　　　　　　　विषय क्रमांक- ८
दिनांक ३/९/२०१४　　　　　　　　　　विभाग-
सुचक- मा. सदगुरु कदम　　　　　　　अनुमोदक- मा. कैलास कदम
संदर्भ-मा.सदगुरु कदम व मा.कैलास कदम यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.४० खराळवाडी येथील बालभवन मधील सांस्कृतिक भवन आतील सभागृहास **“कै.महादेव गोविंद कदम सभागृह”** असे नामकरण करणेत यावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - ८४ विषय क्रमांक- ९

दिनांक ३/९/२०१४ विभाग-

सुचक- मा. सदगुरु कदम अनुमोदक- मा. कैलास कदम

संदर्भ-मा.सदगुरु कदम व मा.कैलास कदम यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.४० खराळवाडी येथील बालभवन मधील व्यायामशाळा (महिला व पुरुष) चे अंतर्गत असलेले दरवाजे बाहेरुन करणे तसेच बालभवन मधील सांस्कृतिक भवन कार्यालयामध्ये दोन खोल्या करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(जम सोनाली पोपट)
सभापती
क क्षेत्रीय समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कक्षेका/कावि/ ८०० /२०१४दि. ११/ ९ /२०१४



प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क क्षेत्रीय समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

---